SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Seminar – 2609141
Fax : +91-231-2691533, 2693294 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन : इपीबीएक्स – 2609000 सेमीनार 2609141
फॅक्स : +91-231-2691533, 2693294 व 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

जा क्र. शिवाजी वि./सेमिनार/663 दि. 24 APR 2025

## परिपत्रक

प्रति,
१. अधिविभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
२. प्राचार्य/संचालक,सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.

विषय:- नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात शिक्षकांसाठी शिबीर / कार्यशाळा आयोजनाबाबत......

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, सन २०२५-२०२६ यावर्षासाठी नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात शिबीर/कार्यशाळा आयोजनाचे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. इच्छुक अधिविभाग / महाविद्यालयांनी आपल्या अधिविभागाच्या / महाविद्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात आलेल्या लिंक वरील **Google form** मध्ये माहिती भरून त्याची प्रत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी. यासाठीची नियमावली व प्रस्तावाचा विहीत नमुना माहितीसाठी विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in → Circular → Affiliation→ Seminar Section** या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| १. | महाविद्यालयीन शिबीर / कार्यशाळा आयोजन प्रस्तावाची ऑनलाईन पूर्तता करून त्याची प्रत दि.०५ /०५/२०२५ पर्यत विद्यापीठ कार्यालयात सादर करावी. |
| २. | महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव संबंधित समितीच्या बैठकीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. त्यानंतर शिबीर/कार्यशाळा आयोजनासाठी प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रत्येक महाविद्यालयास त्यांचे प्रस्ताव मंजूर किंवा नामंजूर झाल्याचे कार्यालयाकडून कळविणेत येईल. |
| ३. | विद्यापीठाकडून मंजुरीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी शिबीर/कार्यशाळा आयोजन लवकरात लवकर करावे |

वरील बाबी विचारात घेऊन महाविद्यालयांनी दि.०५/०५/२०२५ पर्यंत प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयात सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. महाविद्यालयांकडून आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने महाविद्यालयास त्यांचे प्रस्ताव मंजूर झाल्याचे ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

उपकुलसचिव

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Proposal For New Changed Syllabus Training / Workshop

1) Faculty :________________

2) Subject :________________

3) Class and Paper No. & :________________

3.1) Course Code :________________

4) Workshop :________________

5) Co-ordinator :________________

6) Duration :________________

7) Dates :________________

8) No. of Resource Persons :________________

9) A list of Resource Persons :________________

No. of Participants :________________

A) Outstation Participants : - ________________

B) Local Participants :________________

10) Estimated Expenditure :________________

A) T.A. & D.A. to Resource Persons :________________

B) Remuneration to Resource Persons :________________

C) Xeroxing and other expense :________________

D) Miscellaneous expenses :________________

Total Rs.________________

Name & Signature of Co-ordinator

Signature of Principal / Director with Stamp

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## नियमावली

नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात आयोजित केल्या जाणा-या महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रशिक्षण शिबीर/कार्यशाळा संदर्भात मार्गदर्शक सूचना

| | |
|---|---|
| 1. | प्रशिक्षण शिबीरासाठी / कार्यशाळेसाठी शिक्षकांकडून नोंदणी फी आकारू नये. |
| 2. | शिबीराच्या/ कार्यशाळेच्या वेळी संबंधित शिक्षकांना नाष्टा, चहापान व वर्किंग लंच द्यावा. यासाठी कमाल खर्चाची मर्यादा प्रत्येकी रू.१२५ राहील. शिबीरास /कार्यशाळेसाठी मदत करणा-या महाविद्यालयामधील अधिकच्या जास्तीत जास्त १० शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना भोजन खर्च मान्य केला जाईल |
| 3. | प्रशिक्षणासाठी अत्यावश्यक असलेले संदर्भ साहित्य, झेरॉक्स, पेन, फाईल इ. शिक्षकांना उपलब्ध करून द्यावे, त्यासाठी प्रती शिक्षकास रू. ५० इतका खर्च मान्य राहील. |
| 4. | शिबीर /कार्यशाळा कार्यक्रमाच्या वेळी जास्तीत जास्त वेळ हा शिबीरार्थींना मार्गदर्शक करण्यासाठी उपयोगात आणावा. उद्घाटन समारंभासाठी जास्तीत जास्त ३० मिनीटे वेळ देण्यात यावा. तसेच, त्यासाठी रू.५०० एवढाच खर्च मान्य राहील. |
| 5. | शिबीरास/कार्यशाळेसाठी हजर राहणा-या शिक्षकांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्यात येऊ नये. |
| 6. | बीजभाषकास प्रवास खर्च व रू.५०० इतके मानधन देण्यात यावे. |
| 7. | मार्गदर्शक तज्ञांना त्यांचा प्रवास खर्च, विद्यापीठ नियमाप्रमाणे आदा करावा. तसेच प्रत्येक व्याख्यानासाठी रू.३०० प्रमाणे मानधन देणेत यावे. |
| 8. | बीजभाषक, तसेच मार्गदर्षक तज्ञांच्या निबंधाच्या झेरॉक्स प्रती देयकांसोबत विद्यापीठाकडे सादर कराव्यात. |
| 9. | शिबीरास/कार्यशाळेसाठी हजर राहणा-या शिक्षकांची आवशक्य असल्यास राहण्याची व्यवस्था संबंधित आयोजक महाविद्यालयाने विना मोबदला करून द्यावी. |
| 10. | सदर प्रशिक्षण शिबीरास/कार्यशाळेसाठी हजर राहणा-या शिक्षकांना आयोजक महाविद्यालयाने उपस्थिती प्रमाणपत्र **(Attendance Certificate)** द्यावे. |
| 11. | विद्यापीठ परिसरातील अधिविभागामध्ये आयोजित केल्या जाणा-या शिबीरास/कार्यशाळेसाठी उपस्थित राहणा-या शिक्षकांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठाने करावी. |
| 12. | सदर शिबीरास/कार्यशाळेसाठी उपस्थित राहणा-या शिक्षकास कार्यरत रजा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मंजूर करावी. |
| 13. | विद्यापीठाने मंजूर केलेल्या रक्कमेच्या ८०% रक्कम तसलमात म्हणून संबंधित महाविद्यालयास पाठविण्यात यावी. |
| 14. | शिबीर / कार्यशाळा समाप्तीनंतर ०५ दिवसांच्या आत संबंधित संयोजकांनी (प्राचार्यांनी/ पदव्युत्तर विभागप्रमुखांनी) खर्चाचा संपूर्ण हिशोब व मूळ बीले महाविद्यालयाने आपल्याकडे ठेवावीत आणि फक्त विहित नमुन्यामधील चार्टर्ड अकौंन्टट यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र **(Utilization Certificate)**विद्यापीठ कार्यालयास पाठवून द्यावे. (तथापि शिबीर / कार्यशाळा खर्चाचा संपूर्ण हिशोब व मूळ बील विद्यापीठ कार्यालयाच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आयोजक महाविद्यालयास बंधनकारक राहील.) तसेच उपयोगिता प्रमाणपत्रासोबत शिबीर / कार्यशाळेचा सविस्तर अहवाल, शिबीर / कार्यशाळेस उपस्थित असलेल्या शिक्षकांच्या नावाची यादी इ. कागदपत्रे विद्यापीठास सादर करावीत. |